महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ २७ मे २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३२८ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पत्रकार हवे आहेत**

दैंनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९९८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

# बदलापूर कर्जतमध्ये पावसाचा हाहाकार



## मे महिन्यात उल्हास नदीला पूर ■ दोन म्हशी वाहून गेल्या

### पाच गावांचा संपर्क तुटला ■ आणे - भिसोळ गावाचा रस्ता पाण्याखाली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कर्जत, खोपोली परिसरात पडलेल्या अति मुसळधार पावसामुळे कल्याण तालुक्यातील उल्हास नदीस अचानक पूर आला, या पुरात एक बस आणि दोन म्हशी वाहून गेल्याची माहिती आपटी गावचे स्थानिक नागरिक वंसत शिसवे यांनी दिली, तर रायते बदलापूर रस्त्यावर पाणी भरल्याने या परिसरातील५/६गावांचा संपर्क तुटला आहे, विशेष म्हणजे यामुळे' आपती व्यवस्थापन,किती अर्लट, हे लक्षात येते, गेल्या१/२दिवसापासून कर्जत, खोपोली परिसरात तूफान पाऊस पडत आहे, परंतु कल्याण, बदलापूर, परिसरात पावसाची तुरळक रिमझिम सुरू होती, यामुळे सर्व नागरिक बेसावध होते, परंतु आज अचानक उल्हास नदीस प्रंचड पूर आला, यामुळे प्रथम अम्मू रिसार्ट जवळ पाणी भरल्याने रायते आपटी रस्ता बंद झाला, या दरम्यान आपटी गावातील वंसत शिसवे हे नदीच्या काठावर उभे राहून पाण्याची पातळी बघत होते, यावेळी त्यांना पुराच्या पाण्यातून २म्हशी वाहून जात असल्याचे दिसले, यांनतर काही वेळातच एक बस वाहून जाताना दिसली, ते दृश्य मोबाईल मध्ये कैद करण्याच्या आत पाण्याच्या प्रंचड वेगामुळे ती दिसेनाशी झाली,पाण्याच्या पातळीत वाढ होत असल्याने रायते बदलापूर रस्ता पाण्याखाली गेला, यामुळे आपटी चोण, आपटी बा-हे,मांजर्ली, पोई, बांधण्याचा पाडा, कातकरी वाडी, ढोका दापिवली आदी गावाचा संपर्क तुटला, रायते येथे कल्याण मुरबाड रस्त्याच्या पुलाचे काम सुरू आहे, याचेही काही साहित्य वाहून गेल्याची शक्यता नाकारता येत नाही,या अचानक आलेल्या पुरामुळे नदी काठच्या गावाची मोठ्या प्रमाणात पळापळ झाली, काही चे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, या अचानक आलेल्या पुराचे कारण बारवी डँम सोडल्याची अफवा लोकामध्ये पसरल्याचे दिसून आले, तर बाबतीत बारवी डँमचे इंजिनिअर दुश्यांत विखे यांना विचारले असता, आपण तहसीलदार कल्याण यांना पाणी लेवल कळविल्याचे उत्तर देऊन खांदे उडविले, आता सर्व सामान्य माणूस काय तहसीलदार यांना विचारणार आहे का?हे या महाशहाना कोण सांगणार?तर कल्याण मध्ये परिस्थिती वेगळी नव्हती मेट्रोच्या कामामुळे कल्याण मुरबाड मार्गावर सिंधीगेट येथे अनेक बाईक स्वार पडत होते, रस्त्यावर गंटारगंगा वाहत होती, एकूणच पहिल्याच पुरामुळे नागरिकांना प्रंचड त्रास सहन करावा लागला, आणि 'आपत्ती व्यवस्थापन ,संदर्भात देखील अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत,यातील वरीष्ठ अधिकारी व कर्मचारी यांच्यात समन्वय आणि माहिती चा अभाव दिसून आला

## वीजपुरवठ्यावर परिणाम, अंबरनाथ-बदलापूरमध्ये अंधार

**बदलापूर, अंबरनाथ व आसपासच्या परिसरात पावसासोबत वादळी वाऱ्यांचा आणि विजांचा कडकडाट होत आहे. यामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होत असून नागरिकांना अंधारात दिवस काढावा लागत आहे.**




## राज्यात ठिकठिकाणी मुसळधार पाऊस; प्रशासनाने सतर्क राहून मदतकार्य करावे

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** मुंबई २६ – राज्यात अनेक भागांत मुसळधार पाऊस सुरू असून विशेषतः मुंबई कोकण पश्चिम महाराष्ट्रात पुढील काही तास जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे प्रशासनाने सतर्कता ठेवून मदत कार्य करावे असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रशासनाला निर्देश दिले आहेतउपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे जिल्हा तसेच अधिक पाऊस पडत असलेल्या जिल्ह्यांच्या परिस्थितीचा आढावा घेतला, तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांशी चर्चाही केली. पावसामुळे जनजीवन विस्कळीत होऊ नये, तसेच कोणतीही जीवित किंवा वित्तहानी होऊ नये, यासाठी प्रशासनाने वेळेवर आणि प्रभावी पावले उचलावी, असे निर्देश त्यांनी दिले.संपूर्ण यंत्रणा सज्ज ठेवण्यात यावी,तसेच आवश्यकतेनुसार मदत आणि बचाव कार्य तत्परतेने पार पाडावे. पाण्याने भरलेले रस्ते, पुलांची स्थिती, विजेच्या तारा यावर विशेष लक्ष ठेवावे. मोडकळीस झालेल्या आणि धोकादायक इमारतीत संदर्भात देखील काळजी घ्यावी, मुंबई आणि ठाण्यासारख्या ठिकाणी उपनगरीय रेल्वे वाहतूक सुरळीतपणे सुरू कशी राहील, किंवा जिथे मोठी अडचण येईल तिथे प्रवाशांना त्रास कसा होणार नाही यासाठी सतर्क रहावे असेही त्यांनी प्रशासनाला सांगितले हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करावे, आवश्यक नसल्यास घराबाहेर पडू नये, तसेच सखल भागांमध्ये राहणाऱ्यांनी विशेष सावधगिरी बाळगावी. प्रशासन तुमच्या मदतीसाठी तत्पर आहे, मात्र नागरिकांनी देखील सहकार्य करणे गरजेचे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.राज्यात सध्या मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे आणि नाशिक या जिल्ह्यांत पावसाचा सर्वाधिक जोर दिसून येत आहे.राज्य सरकार परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सर्व उपाययोजना राबविण्यात येत आहेत असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले

## गांधारी खाडीच्या पात्रात मातीभराव – आ. भोईरांची कारवाईची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याणमध्ये अनधिकृत कामांचा सुळसुळाट पाहायला मिळत आहे. कल्याणमधील गाधारी खाडीपात्रात अतिक्रमण करण्यात आल्याचा बाब उघडकीस आली आहे. या पात्रात भराव टाकून अनधिकृत बांधकाम सुरु असल्याचं समोर आलं आहे. या धक्कादायक प्रकारानंतर आमदार विश्वनाथ भोईर यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. आमदार विश्वनाथ भोईर यांनी अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.



कल्याण गांधारी परिसरात आमदार विश्वनाथ भोईर यांनी गांधारी खाडी किनारी असलेल्या धोकादायक परिसराची पाहणी केली. या पाहणीदरम्यान खाडी पात्रात भराव टाकून खाडीचे पात्र अरुंद करण्यात आल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. अनधिकृत भराव टाकून बांधकाम करणाऱ्यावर कारवाई करण्यासाठी आमदार भोईर तक्रार करणार असल्याचे सागितले. कल्याण-पडघा मार्गावरील गांधारी पुलावर झालेल्या भीषण अपघातप्रकरणी पोलिसांनी डंपर चालकाला एका दिवसातच जामीनावर सोडल्याने, पोलिसांची भूमिका संशयास्पद असल्याचा ठपका आमदार विश्वनाथ भोईर आणि आमदार शांताराम मोरे यांनी ठेवला आहे. घटनास्थळी पाहणी करून त्यांनी पोलिसांवर गंभीर आरोप केले आहेत. दोन दिवसांत कारवाई न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांची गडचिरोलीला बदली करण्याची मागणीही आमदार भोईर यांनी केली आहे . कल्याणमध्ये पुन्हा अनधिकृत बांधकाम आढळल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.

## इलेक्ट्रिक बस पुरवठ्यात कंपनीचा हलगर्जीपणा – परिवहन मंत्र्यांची तक्रार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** - ५१५० भाडेतत्त्वावरील इलेक्ट्रिक बस पुरवठा करण्यात संबंधित कंपनी निष्क्रिय ठरली असून या कंपनीसोबत एसटी महामंडळाने केलेला निविदा करार रद्द करण्याबाबत कारवाई करावी असे निर्देश परिवहन मंत्री तथा एस टी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले. ते आज महामंडळाच्या मुख्यालयात बोलावलेल्या आढावा बैठकीमध्ये बोलत होते.

मंत्री सरनाईक म्हणाले, २२ मे पर्यंत संबंधित बस पुरवठादार संस्थेला १ हजार बसेस पुरवठा करण्याचे सुधारित वेळापत्रक दिले होते. परंतु या कालावधीपर्यंत एकही बस संबंधित कंपनीला पुरविणे शक्य झाले नाही. त्यामुळे भविष्यात या संस्थेकडून बसेस पुरवठा करण्याबाबत साशंकता आहे. सध्या महामंडळाला बसण्याची अत्यंत आवश्यकता असताना संबंधित संस्था जर वेळेत बस पुरवठा करू शकत नसेल तर या कंपनी सोबत केलेला निविदा करार रद्द करावा.

**शिवशाही बसेसचे हिरकणी मध्ये रुपांतर**

सध्या एसटी महामंडळाकडे चालनात असलेल्या शिवशाही बसेसची टप्प्या टप्प्याने पुनर्बांधणी करून त्याचे रूपांतर हिरकणी (निम आराम) बसेस मध्ये करण्यात यावे. तसेच त्या बसेस पूर्वीप्रमाणे हिरव्या पांढऱ्या रंगातच असाव्यात असे निर्देश मंत्री सरनाईक यांनी यावेळी दिले.





## खासदार बाळ्यामामांनी भर पावसात केली भिवंडीतील नालेसफाईची पाहणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** -पावसाळ्याला सुरुवात झालेली आहे भिवंडी शहरांमध्ये पावसामुळे पूरजन्य परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी महानगरपालिका प्रशासनाने कोट्यावधी रुपयाची निविदा सुचना प्रक्रिया करून कंत्राटदारा मार्फत गटार व नाले सफाई चे काम सुरू केले आहे, मात्र ते काम अर्धवट स्थितीत आहे.त्यामुळे भिवंडीत पुरजन्य परिस्थिती निर्माण होऊ शकण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

सार्वजनिक मुख्य व अंतर्गत रस्त्यावर सर्वत्र दुर्गंधी व अस्वच्छता निर्माण झाली आहे,त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झालेला आहे याबाबत भिवंडीचे खासदार सुरेश (बाळा मामा ) म्हात्रे यांच्याकडे तक्रार जातात आज सकाळी भरपावसात त्यांनी पालिका अधिकारी व माजी उपमहापौरा सोबत शहरातील विविध भागात फिरून गटार व नाले सफाई कामाची पाहणी करुन तीव्र नाराजी व्यक्त करत अधिकारी व कर्मचाऱ्यांची कान उघडणी केली, भिवंडी शहरांमध्ये योग्य पद्धतीने गटार व नाले सफाई काम करा,स्वच्छता मोहीम करा अन्यथा आपल्यावर निलंबनाची ची कारवाई केली जाईल असा इशारा दिला आहे.

### अधिकाऱ्यांना फैलावर घेत कानउघडणी

पावसामुळे शहरात पूरजन्य परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी भिवंडी महापालिका प्रशासनाने सुमारे दोन कोटी 97 लाख रुपये खर्चाची निविदा सुचना काढून 1 ते 5 प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील गटार व नाले सफाई करण्याचा खाजगी ठेका विविध पाच कंत्राटदारांना दिला आहे. एक ते पाच प्रभाग समिती कार्यक्षेत्रात असलेली गटार व नाले सफाईचे काम कंत्राटदारा मार्फत केले जात आहे.

या कामावर लक्ष ठेवण्यासाठी महापालिका आयुक्त अनमोल सागर यांनी आरोग्य व स्वच्छता विभागाचे विभाग प्रमुख, प्रभाग अधिकारी, निरीक्षक, मुकादम ,तसेच बांधकाम विभागाच्या अधिकारी व उपायुक्त निर्देश दिलेले आहेत मात्र प्रत्यक्षात या कामाकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे कंत्राटदार चे काम अत्यंत कासवगतीने सुरू आहे. शहरातील सार्वजनिक रस्त्यावर मोठ्या प्रमाणात कचरा व घाणीचे साम्राज्य पसरले आहे, त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे पावसाळा सुरू झाल्यामुळे रस्त्यावर सर्वत्र चिखल निर्माण झाला आहे. याबाबत नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी भिवंडीचे खासदार सुरेश (बाळ्या मामा) म्हात्रे यांच्याकडे तक्रार करतात आज सकाळी भरपावसात त्यांनी विविध भागातील गटार व नाले सफाईच्या कामाची पाहणी केली त्यांना तेथे अत्यंत अस्वच्छता व घाणीचे साम्राज्य दिसल्यामुळे उपस्थित अधिका -यांची कान उघडणी करत पावसाळ्यापूर्वी सर्वत्र स्वच्छता व गटार,नालेसफाई कामे करण्याचे निर्देश दिले तसेच शहराचे विकास कामासाठी आराखडा तयार करण्याचे आदेश दिले.









# गीतासार



## अध्याय ११
## विश्वरूपदर्शनयोग:

तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं प्रसादये त्वामहमीशमीड्यम् । पितेव पुत्रस्य सखेव सख्युः प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम् ॥ ११-४४ ॥

म्हणूनच हे प्रभो, मी आपल्या चरणांवर शरीराने लोटांगण घालून नमस्कार करून स्तुत्य अशा आपण ईश्वराने प्रसन्न व्हावे, म्हणून प्रार्थना करीत आहे. हे देवा, वडील जसे पुत्राचे, मित्र जसे मित्राचे आणि पती जसे आपल्या प्रियतम पत्नीचे अपराध सहन करतात, तसेच आपणही माझे अपराध सहन करण्यास योग्य आहात. ॥ ११-४४ ॥

अदृष्टपूर्वं हृषितोऽस्मि दृष्ट्वा भयेन च प्रव्यथितं मनो मे । तदेव मे दर्शय देवरूपं प्रसीद देवेश जगन्निवास ॥ ११-४५ ॥

पूर्वी न पाहिलेले आपले हे आश्चर्यकारक रूप पाहून मी आनंदित झालो आहे आणि माझे मन भीतीने अतिशय व्याकूळही होत आहे. म्हणून आपण मला ते चतुर्भुज विष्णुरूपच दाखवा. हे देवेशा, हे जगन्निवासा, प्रसन्न व्हा. ॥ ११-४५ ॥


किरीटिनं गदिनं चक्रहस्तमिच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव । तेनैव रूपेण चतुर्भुजेन सहस्रबाहो भव विश्वमूर्ते ॥ ११-४६ ॥

मी पहिल्यासारखेच आपणाला मुकुट धारण केलेले तसेच गदा आणि चक्र हातात घेतलेले पाहू इच्छितो. म्हणून हे विश्वस्वरूपा, हे सहस्रबाहो, आपण त्याच चतुर्भुज रूपाने प्रकट व्हा. ॥ ११-४६ ॥

श्रीभगवानुवाच मया प्रसन्नेन तवार्जुनेदं रूपं परं दर्शितमात्मयोगात् । तेजोमयं विश्वमनन्तमाद्यं यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वम् ॥ ११-४७ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, हे अर्जुना, मी तुझ्यावर अनुग्रह करण्यासाठी आपल्या योगशक्तीच्या प्रभावाने हे माझे परम तेजोमय, सर्वांचे आदि, सीमा नसलेले, विराट रूप तुला दाखविले. ते तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणीही यापूर्वी पाहिले नव्हते. ॥ ११-४७ ॥

# रेसिपी
## मिक्स व्हेज



साहित्य :
1 मोठा तुकडा फ्लॉवर तुकडे करून
1/4 वाटी पत्ता कोबी चिरून
1/4 वाटी मटार दाणे
1/2 बटाटा तुकडे
1 गाजर स्वच्छ धुवून पुसून तुकडे
तेल गरजेनुसार
हळद, तिखट, मीठ, धणे पावडर, हिंग कोथिंबीर बारीक चिरून
1 छोटा कांदा बारीक चिरून

कृती :
सर्व भाज्या चिरून धूवून घ्या. तेलाची फोडणी करून त्यात मोहरी, हिंग, हळद, धणे पावडर घालून कांदा परतून घ्यावा. चिरलेल्या भाज्या घालून मीठ घालून शिजवून घ्या.भाजी शिजत आल्यावर मटार दाणे आणि तिखट घालून एक वाफ आणावी.कोथींबीर घालावी.

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या मोहीमेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना (पीएम किसान) ही केंद्र शासनाची योजना खातेदारक शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळावे, या उद्देशाने दि.1 फेब्रुवारी 2019 पासून राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेच्या निकषांप्रमाणे पात्र शेतकरी कुटुंबीयास रु.2 हजार प्रति हप्ता याप्रमाणे चार महिन्यातून एकदा, असे एकूण रु.6 हजार प्रति वर्ष लाभ मिळत आहे. ही रक्कम शेतकऱ्यांना खते, बियाणे व औषधे इत्यादीच्या निविष्ठा खरेदी व इतर गरजा यांच्यासाठी कामी येत आहे.

पीएम किसान योजनेच्या 20व्या हप्त्याचा लाभ मिळण्यासाठी पात्र शेतकऱ्यांचे ई-केवायसी प्रमाणीकरण, बँक खाते आधार संलग्न करणे, भूमी अभिलेख नोंदणी अद्यावत करणे या बाबी केंद्र शासनाने अनिवार्य केलेल्या आहेत. याकरिता गावपातळीवर दि.1 मे 2025 ते 31 मे 2025 या कालावधीत पीएम किसान योजनेची संपृक्तता मोहीम राबविण्यात येत आहे.

या मोहिमेदरम्यान ई-केवायसी प्रमाणिकरण बाकी असलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या नजिकच्या सामाईक सुविधा केंद्र व ग्रामस्तरीय नोडल अधिकारी (VNOs) यांच्यामार्फत ई-केवायसी प्रमाणिकरण पूर्ण करावे. शेतकऱ्यांनी स्वतःचे ई-केवायसी प्रणाणिकरण करण्यासाठी मोबाईल वरील ओटीपी, सामाईक सुविधा केंद्र, पी.एम. किसान फेस ऑथेंटिकेशन अॅप या सुविधांपैकी कोणत्याही एका सुविधेचा वापर करावा. बँक खाते आधार संलग्न करणे बाकी असलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या सोईनुसार नजीकच्या पोस्ट कार्यालयामध्ये आधार संलग्न खाते उघडावे. पीएम किसान योजनेत नव्याने सहभागी होण्यासाठी आपल्या गावातील कृषी सहाय्यक, सी.एस.सी. सेंटर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन कोकण विभागीय कृषी सहसंचालक बालाजी ताटे यांनी केले आहे.

कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभाकरिता शेतकरी ओळखपत्र क्रमांक (Farmer ID) दि.15 एप्रिल 2025 पासून अनिवार्य करण्यात आला आहे. शेतकऱ्याचा आधार क्रमांक हा शेतकऱ्याच्या आणि त्याच्या शेताच्या माहितीशी जोडून प्रत्येक शेतकऱ्याला शेतकरी ओळख क्रमांक (Farmer ID) देण्यात येत आहे. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप शेतकरी ओळखपत्र क्रमांक (Farmer ID) साठी नोंदणी केलेली नाही त्या शेतकऱ्यांनी तातडीने सदर पोर्टलवर नोंदणी करावी. तसेच अधिक माहितीकरीता शेतकऱ्यांनी जवळच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहनही कोकण विभागीय कृषी सहसंचालक बालाजी ताटे यांनी केले आहे.

# मंत्री विजय शहा यांच्या विरोधात काँग्रेसची तक्रार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



भिवंडी : कर्नल सोफिया कुरेशी यांच्या संदर्भात वादग्रस्त बेताल वक्तव्य करणारे मध्यप्रदेशातील मंत्री व भाजपाचे नेते विजय शहा यांची पक्षाने मंत्रिमंडळातून हकालपट्टी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र काँग्रेस पक्षाच्या प्रदेश सरचिटणीस राणी अग्रवाल यांनी केली आहे तसेच त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी यासाठी श्रीमती अग्रवाल यांनी भिवंडी न्यायालयात तक्रारी अर्ज दाखल केला असल्याची माहिती त्यांनी दिली.

काश्मीर पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय सैनिकांनी केलेल्या " ऑपरेशन सिन्दुर " या कारवाईची माहिती देशवासीयांना देण्याची जबाबदारी कर्नल सोफिया कुरेशी व व्योमिक सिंग या महिला अधिकाऱ्यांनी कर्तव्य म्हणून बजावली. त्यानंतर मध्यप्रदेश येथील मंत्री विजय शाह यांनी कर्नल सोफिया कुरेशी यांच्या संदर्भात बेताल वक्तव्य केले त्यांमुळे या वक्तव्या विरोधात देशभरातून टीका होत आहे.न्यायालयाने सुध्दा या वक्तव्य संदर्भात नाराजी व्यक्त केली आहे. मात्र भाजपा कडून बेताल वक्तव्या बाबतीत कोणतीही कारवाई केली गेली नाही.त्यामुळे सर्व सामान्य नागरिकां मध्ये संताप व्यक्त केला जात असुन मंत्री विजय शाह यांच्या विरोधात न्यायालयाने गुन्हा दाखल करण्यात यावा यासाठी भिवंडी न्यायालयात न्याय दंडाधिकारी यांच्या समोर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस राणी अग्रवाल यांनी तक्रार अर्ज दाखल केला असल्याची माहिती राणी अग्रवाल व वकील अॅड.फारूक मोमीन यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. यावेळी पक्षाचे नेते असमद सिध्दीकी,आसिफ आजमी, फिरोज भिवंडीवाला,एस. मोहम्मद अन्सारी व काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते." ऑपरेशन सिन्दुर " कारवाईच्या माध्यमातून पाकिस्तानी सैन्यासह अतिरेक्यांना भारतीय जवानांनी चोख प्रत्युत्तर दिले आहे.

त्यामुळे सैनिकांचे सर्वत्र कौतुक होत आहे. सैनिकांनी यशस्वी केलेल्या कारवाईची माहिती देण्याची जबाबदारी सैन्य दलाच्या अधिकारी कर्नल सुफिया कुरेशी यांनी यशस्वीपणे सांभाळली असे असताना मंत्री विजय शाह यांनी भारतीय सैन्यातील महिला अधिकाऱ्या बाबतीत बेताल गैर वक्तव्य करून अपमान केला आहे त्यामुळे त्यांच्या विरोधात भा.न्या. सं.कलम १९६,१९७ नुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी राणी अग्रवाल यांनी तक्रारी अर्जात न्यायालयात केली आहे.मंत्री विजय शाह यांनी त्यांच्यावर केलेले आरोप हे देशात धर्म व जाती मधील सलोखा बिघडवणारे,तेढ निर्माण करणारे द्वेषभावना पसरवणाऱ्या भावनांना प्रोत्साहन देणारे असल्याचा मुद्दा त्यांनी तक्रारी अर्जात उपस्थित केला आहे.

संवेधानिक जबाबदार पदावर असणाऱ्या माणसाने कर्नल सोफिया कुरेशीवर लावलेले आरोप हे लांच्छनास्पद असून कर्नल सोफिया कुरेशी आणि इतर व्यक्तींमध्ये असंतोष किंवा शत्रुत्व किंवा द्वेष किंवा द्वेषभावना निर्माण करणारे असल्याचे मत राणी अग्रवाल यांनी व्यक्त केले आहे.भाजपाने त्यांची मंत्रिपद व पक्षातून हकालपट्टी करावी अशी मागणी सुध्दा राणी अग्रवाल यांनी केली आहे.

# सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाचा समारोप

**हिंदूंनी भारताला हिंदु राष्ट्र करण्यासाठी आवश्यक ती पाऊले उचलावीत !**
**– आमदार टी. राजासिंह, तेलंगणा**

**भारतासह २३ देशांतील ३० हजार हिंदूंचा सहभाग**

संत-गुरुजन नेहमी सांगायचे, ‘आगामी काळ युद्धाचा आहे. त्या युद्धात विजय मिळवण्यासाठी, ते युद्ध लढण्यासाठी प्रत्येक हिंदूने तयार होण्याची आवश्यकता आहे.’ पहेलगामच्या हल्ल्यात धर्म विचारून माणसे मारली गेली. पूर्वीही औरंगजेब असो, अकबर असो किंवा इतर अनेक शत्रूंनी हिंदूंचे नाव विचारून, धर्म विचारून त्यांचे धर्मांतर केले. जे धर्मांतर करत नव्हते, त्यांना मारले गेले. आज त्याचेच बिघडलेले वंशज त्यांच्याच मार्गदर्शनावर चालत आहेत. अशा प्रवृत्तीचे लोक केवळ पहेलगाममध्येच नाही, तर प्रत्येक राज्यात, प्रत्येक जिल्ह्यात लपलेले असू शकतात. त्यामुळे हिंदूंनी आपल्या मुलांना स्वसंरक्षणासाठी प्रशिक्षण द्यायला हवे. जो लढेल तोच वाचेल. जो लढणार नाही त्यांच्यासाठी येणारा काळ खूप कठिण आहे. त्यामुळे येथून जाण्यापूर्वी समस्त हिंदूंनी एक असा संकल्प घ्या की, आगामी काळात भारताला हिंदु राष्ट्र बनवण्यासाठी आवश्यक ते प्रत्येक पाऊल उचलू आणि संघटितपणे राहू, असे आवाहन तेलंगणा येथील भाजपचे प्रखर हिंदुत्वनिष्ठ आमदार श्री. टी. राजासिंह यांनी केले. ते ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा’त बोलत होते.

गोव्याच्या पवित्र भूमीत ‘सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवलेनगरी’ येथे सुरू असलेल्या ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा’चा भव्य आणि भक्तिमय समारोप झाला. भारतासह जगभरातील २३ देशांतून आलेले सुमारे ३० हजार हिंदू धर्मप्रेमी आणि साधक यांनी महोत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून हिंदु एकात्मतेचे दर्शन घडवले. हा महोत्सव म्हणजे हिंदु राष्ट्र स्थापनेच्या दिशेने पडलेले एक महत्त्वाचे पाऊल होते.

या महोत्सवात विविध आध्यात्मिक, राष्ट्रहितकारी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महत्त्वाचे म्हणजे भारताच्या विजयासाठी, तसेच भारतीय सैन्य, सनातन धर्मप्रेमी आणि राष्ट्ररक्षण यांसाठी आयोजित शतचंडी यज्ञ, तर समस्त सनातन हिंदु धर्मियांसाठी चांगले आरोग्य लाभो यासाठी महाधन्वंतरी यज्ञ भावपूर्णरित्या पार पडला. यासाठी तामिळनाडू येथून ३५ पुरोहित आले होते.

सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्या शुभहस्ते ‘सनातन धर्मध्वजा’चे जयघोषात आरोहण करण्यात आले. या महोत्सवात देशभरात राष्ट्र अन् धर्म कार्य करणाऱ्या २५ राष्ट्र अन् धर्म निष्ठ व्यक्तींना ‘हिंदु राष्ट्ररत्न’ आणि ‘सनातन धर्मश्री’ पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हे पुरस्कार आता दरवर्षी दिले जाणार आहेत.

महोत्सवात प्रसिद्ध कीर्तनकार श्री. चारुदत्त आफळे यांनी सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचा जीवनपट कीर्तनाच्या माध्यमातून भावपूर्णरित्या उलगडला. यातून राष्ट्रगुरु कसे असतात, त्यांचे कार्य कसे असते आणि त्यातून समाज धर्मप्रवण कसा होतो हे लोकांसमोर मांडले. गोव्याच्या संस्कृतीचे पारंपारिक नृत्य, गुरुवंदना गीत, सांस्कृतिक कार्यक्रम, तसेच धर्मशिक्षण आणि साधनासंवर्धनासाठी ग्रंथप्रदर्शनांचा हजारो भाविकांनी लाभ घेतला.

या महोत्सवात श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरिजी, अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष पू. महंत रविंद्र पुरीजी महाराज, अयोध्या हनुमानगढी येथील पू. महंत राजू दास, श्रीक्षेत्र तपोभूमी (कुंडई, गोवा) पिठाधीश्वर पद्मश्री सद्गुरु ब्रह्मेशानंदाचार्य स्वामीजी, ‘सनातन बोर्ड’चे प्रणेते पूज्यश्री देवकीनंदन ठाकूरजी महाराज, केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपादजी नाईक, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोदजी सावंत, माजी केंद्रीय माहिती आयुक्त श्री. उदय माहुरकर, तसेच काशी-मथुरा येथील मंदिरांचा खटला लढवणारे सर्वोच्च न्यायालयातील अधिवक्ता विष्णु शंकर जैन आदी अनेक मान्यवर वक्त्यांनी अध्यात्म, राष्ट्र आणि धर्म आदी विविध विषयांवर हजारो हिंदूंचे प्रबोधन केले. एकूणच या महोत्सवातून सर्वांना राष्ट्रधर्माचे कार्य करण्यासाठी आध्यात्मिक, वैचारिक आणि शारीरिक बळ मिळाले आहे.

# आईच्या वाढदिवसानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना स्पिकर भेट



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


पेण : कै.इंदुबाई रामदास गावंड यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त 23 मे 2025 रोजी आवरे येथे शालेय विद्यार्थ्यांना स्पिकर भेट देण्यात आले.

याच दिवशी दिवसभर गावंड परिवाराकडून कीर्तन,भजन तसेच हरिपाठ यातून आईलाआदरांजली वाहण्यात आली.श्री रामदास गवत्या गावंड कला, क्रीडा, शैक्षणिक व सामाजिक संस्था, आवरे यांच्या कडून कै. इंदुबाई रामदास गावंड यांच्या स्मरणार्थ एक सामाजिक बांधिलकी म्हणून नेहमीच आपल्या शैक्षणिक, सामाजिक कार्य करत असताना गावंड परिवाराकडून शिक्षण क्षेत्रामध्ये शाळेत उपयुक्त साहित्य दिले जाते. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगती साधावी हा आई-वडिलांचा शिक्षणाबद्दलचा आग्रह आणि शिक्षणाचे महत्त्व जपणारा वारसा गावंड परिवाराकडून जोपासाला जात आहे.

याच अनुषंगाने गावंड परिवाराकडून रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोठी जुई व शाळा कडापे या शाळेतील विद्यार्थ्यांच्या साठी उपयुक्त असे ब्लूटूथ स्पीकर भेट म्हणून देण्यात आली.

# वीज पडून विद्यार्थाचा दुर्दैवी मृत्यू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



मुरबाड : मुरबाड तालुक्यात रविवारी सकाळपासून पावसाने हजेरी लावली असताना धसई परिसरातील इंदे येथील कु.यश रमेश लाटे वय.16 वर्षे या शाळेय विद्यार्थाचा विज पडून मृत्यू झाल्याने इंदे गावांसह परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

गेल्या आठवडाभरात मुरबाड तालुक्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली असताना रविवारी सकाळपासून ढगाळ वातावरण होते अखेर दुपारी बारा वाजता जोरदार वादळी पावसाने सर्वत्र धुमाकूळ घातला असता विजेचा गडगडाट ही होता. संध्याकाळी पाचच्या सुमारास कु.यश रमेश लाटे वय 16 वर्षे याचे अंगावर विज पडून त्याचा मृत्यू झाला.दुर्दैवाची बाब म्हणजे नुकताच लागलेल्या दहावीच्या परिक्षेत कु. यश ने विशेष गुणवत्ता संपादन केली होती आणि तो आता अकरावीला प्रवेश घेण्यासासाठी तयारीत होता.परंतु काळाने यश चा घात केला आणि त्याचे आई वडिलांचे मुलाला उच्चशिक्षित बनविण्याचे स्वप्न भंगले. त्याच्या अकाली मृत्युने सर्वत्र शोककळा पसरली आहे.

# बंडू पाटील यांचा वाढदिवस संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : शिवसेना कल्याण ग्रामीण विधानसभा संघटक, बंडू पाटील यांचा वाढदिवस डोंबिवली शिवसेना मध्यवर्ती शाखेमध्ये शिवसेना पदाधिकारी आणि कार्यकर्त्यां सोबत जिव्हाळयाने आणि थाटामाटात संपन्न झाला.बंडू पाटील यांचा वाढदिवस दिनांक 25 मे २०२५ रोजी सायंकाळी सात वाजता शिवसेना मध्यवर्ती शाखेमध्ये केक कापून संपन्न झाला.बंडू पाटील यांचा राजकीय प्रवास एक सामान्य शिवसैनिक म्हणून सुरुवात झाली आणि आज कल्याण ग्रामीण शिवसेना ग्रामीण विधानसभा संघटक म्हणून कार्यरत आहे कुठल्याही पदाची अपेक्षा आणि मोह नाही फक्त आदेशाचेच पालन करणे हेच कर्म. शिवसेना पक्षाशी एकनिष्ठ आणि सर्व पदाधिकारी कार्यकर्त्या चा विश्वास आणि म्हणजे बंडू पाटील. बंडू पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी गुळवलीचे माजी उपसरपंच , शिवसेना गोळवली विभाग प्रमुख नकुल पाटील, उमेश शेलार, राजेश कदम उपजिल्हाप्रमुख, संतोष चव्हाण, डोंबिवली शहर सचिव, आणि विधानसभा 143 क्षेत्र संघटक. अमरनाथ विवेक खामकर कळवा मुंब्रा डोंबिवली विभाग संघटक, मोडक साहेब, संतोष उपशहर प्रमुख, शिवराम, असे अनेक पदाधिकारी आणि शिवसेनेत उपस्थित होते.

# मुंबई- नाशिक महामार्गा लगत असलेल्या अनधिकृत पार्किंग करणाऱ्या वाहनांवर कारवाई करा : मनसेची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



वासिंद : मुंबई- नाशिक महामार्गा लगत असलेल्या वाहनतळ (पार्किंग) मार्गिकेचा वापर न करता अवैधरीत्या वाहनतळावर (पार्किंग) केल्या जात असलेल्या वाहनांवर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे वासिंद शहर अध्यक्ष अमोल बोराडे यांनी सहा.पोलीस निरीक्षक, महामार्ग पोलिस केंद्र शहापूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मुंबई - नाशिक महामार्गावर अनेक अपघात घडून यामध्ये काही गंभीर जखमी होत असून काहींना जीव गमवावा लागत आहे. त्यामुळे येथील प्रवास धोकादायक ठरत आहे. परंतु या घडणाऱ्या अपघातात रस्ता दुरावस्था, चालकांचे अनियंत्रितपणा याबरोबरच यामध्ये जास्तीत जास्त अपघात हे महामार्ग लगत अवैधरित्या उभ्या असलेल्या वाहनांना धडक देऊन झाले आहेत असे अमोल बोराडे यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात शहराध्यक्ष अमोल बोराडे यांच्या समवेत मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोपतराव, महिला सेना जिल्हा उपाध्यक्षा सुनीता सासे, महिला सेना तालुका अध्यक्षा सविता गोणे, लोकसभा सचिव सुजाता केदारे, शहापूर शहर अध्यक्ष विनोद पाठारी, वासिंद शहर उपाध्यक्ष कल्पेश शेलार, कुणाल पाठव, विकास तांगडे, मिलिंद तारमळे, सोमनाथ शिंदे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी महामार्ग पोलिस केंद्र, शहापूर यांच्याकडे निवेदन सादर करुन कारवाई करण्याची मागणी केली आहे.

दरम्यान, मुंबई नाशिक या महामार्गावरील असलेल्या वाहनतळ (पार्किंग) चा वापर न करता काही वाहन चालक अत्यंत बेशिस्तपणे कुठेही वाहन उभे करत असल्याचे निदर्शनास येत असून अशा अवैध उभ्या असलेल्या अवजड वाहनाला इतर वाहने धडकून अपघात घडत आहेत. त्यामुळे अशा बेशिस्त वाहन चालकांवर योग्य ती कारवाई करावी अन्यथा मनसे स्टाईलने या वाहन चालकांवर कारवाई केली जाईल असे म्हटले आहे.

# पाशा पटेल यांचा ठाणे जिल्हा दौरा
## आज टिटवाळ्यात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष (मंत्री दर्जा) व मुख्यमंत्री पर्यावरण व शाश्वत विकास टास्क फोर्सचे कार्यकारी अध्यक्ष श्री. पाशा पटेल हे ठाणे जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून त्यांचा दि.27 ते 28 मे 2025 रोजीचा दौरा पुढीलप्रमाणे आहे.

दि.27 मे 2025 रोजी सकाळी 9.30 वाजता विश्रामगृह, मुरबाड येथून वाहनाने टिटवाळा, ठाणे कडे प्रयाण. सकाळी 11 वाजता टिटवाळा, ठाणे येथे बांबू लागवड कार्यक्रम मेळाव्यास उपस्थिती. दुपारी 2.20 वाजता टिटवाळा, ठाणे येथून वांगणी, अंबरनाथ ठाणेकडे प्रयाण. दुपारी 3 वाजता वांगणी, अंबरनाथ, ठाणे येथे बांबू लागवड कार्यक्रम मेळाव्यास उपस्थिती. सोईनुसार शासकीय विश्रामगृहकडे प्रयाण व मुक्काम.

दि.28 मे 2025 रोजी सकाळी 10 वाजता विश्रामगृह, ठाणे येथून वाहनाने पाचवड, ठाणे कडे प्रयाण. सकाळी 11 वाजता पाचवड, ठाणे येथे बांबू लागवड कार्यक्रम मेळाव्यास उपस्थिती व मिरा भाईंदर, ठाणेकडे प्रयाण. दुपारी 2 वाजता पाचवड, ठाणे येथून मिरा भाईंदर, ठाणेकडे प्रयाण. दुपारी 3 वाजता मिरा भाईंदर, ठाणे येथे बांबू लागवड कार्यक्रम मेळाव्यास उपस्थिती. सोईनुसार शासकीय निवासस्थान अवंती-अंबर मलबार हिल, मुंबईकडे प्रयाण.

# दिवा खाडीत अवैधरित्या रेती उपसा करणाऱ्यांवर कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : मुंब्रा खाडी परिसरात रेल्वे पुलालगत अवैध रेती उत्खनन सुरू असल्याची माहिती महसूल विभागाला प्राप्त झाली. त्यानुषंगाने ठाणे उपविभागीय अधिकारी उर्मिला पाटील तसेच ठाणे तहसिलदार उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने दि.25 मे 2025 रोजी मुंब्रा ते कल्याण दरम्यान रेल्वे ट्रॅकजवळील खाडी परिसरात गस्त घालण्याची कार्यवाही राबविली. या गस्त दरम्यान दिवा खाडीमध्ये एक बोट (बार्ज) आणि सक्शन पंपच्या सहाय्याने अवैध रेती उत्खनन होत असल्याचे आढळून आले. महसूल विभागाच्या पथकाने तत्काळ हस्तक्षेप करीत बार्ज व सक्शन पंप खाडीमध्येच बुडवून नष्ट केले. नष्ट करण्यात आलेल्या मुद्देमालाची अंदाजे किंमत 50 लाख रुपये इतकी आहे.

या कारवाईमुळे खाडी परिसरात सुरू असलेल्या अवैध रेती उपशावर आळा बसणार असून पुढील काळातही अशी कारवाई सातत्याने सुरू ठेवली जाणार आहे, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.या कारवाईत बाळकुम मंडळ अधिकारी शशिकांत जगताप व त्यांचे सर्व ग्राम महसूल अधिकारीही सहभागी झाले होते.






# उल्हासनगरात खड्ड्यांमुळे अपघातांची मालिका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर, ता. २६ (वार्ताहर):** शहरात सुरू असलेल्या भुयारी गटारांच्या अपूर्ण कामांमुळे रस्त्यांची चाळण झाली आहे. तसेच ड्रेनेज लाइनचे काम अपूर्ण असून, अनेक ठिकाणी खड्डे भरलेले नाहीत. त्यामुळे शहरात अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सोमवारी (ता. २६) दुपारी उल्हासनगरच्या श्रीरामनगर सेक्शन २८ पुनम हॉटेलसमोर एका खडीने भरलेल्या ट्रकचा एक चाक रस्त्यातील खोल खड्ड्यात अडकला. यामुळे परिसरात वाहतुकीचा खोळंबा निर्माण झाला. रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला. विशेष म्हणजे हा अपघात नेमका त्याच ठिकाणी झाला जिथे काही महिन्यांपूर्वी ड्रेनेज लाइन टाकण्याचे काम करण्यात आले होते.

घटनेची माहिती मिळताच महापालिकेची यंत्रणा जागी झाली. तातडीने तीन जेसीबी मशीन घटनास्थळी दाखल झाल्या. अडकलेला ट्रक मोठ्या प्रयत्नांती बाहेर काढण्यात आला. सुमारे एक ते दीड तासानंतर वाहतूक पूर्वपदावर आली. या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी महापालिका आणि ठेकेदाराच्या दुर्लक्षित भूमिकेवर ताशेरे ओढले. काम झाल्यानंतर रस्ते व्यवस्थित बुजवले गेले असते, तर आजचा अपघात टळला असता. दरवर्षी हीच परिस्थिती का, असा सवाल संतप्त नागरिकांनी केला.

# ठाण्यातील तुळजाभवानी मंदिरात पाणी गळती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** शहरात अलीकडेच बांधण्यात आलेल्या तुळजाभवानी मंदिरात पावसाच्या पहिल्याच सरीने गळती होऊ लागल्याचे दिसून येत आहे. अत्याधुनिक स्वरूपात उभारण्यात आलेल्या या मंदिराच्या गाभाऱ्यातच पावसाचे पाणी गळत असल्याचे चित्र दिसत आहे. मंदिराचे बांधकाम नुकतेच पूर्ण झाले असून काही महिन्यांपूर्वीच ते भाविकांसाठी खुले करण्यात आले होते. मात्र मंदिरात गळती होत असल्याने चर्चांना उधाण आले आहे. देशातील ५१ शक्तीपीठांपैकी आणि राज्यातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक पुर्ण शक्तीपीठ म्हणून तुळजापुरचे तुळजाभवानी मंदीर ओळखले जात असून या शक्तीपीठाचे एक रुप ठाण्यात साकारण्यात आले आहे. ठाण्यातील पाचपाखाडी भागात प्रति तुळजापुर मंदीराची उभारणी मार्च महिन्यात करण्यात आली होती. काळ्या पाषाणात हे मंदिर उभारण्यात येत आले आहे. ३० एप्रिलला शरद पवार आणि त्यांच्या पत्नी प्रतिभा पवार यांच्या हस्ते मंदिरात प्राणप्रतिष्ठा करण्यात आली होती.

# प्लेसमेंटच्या नावाखाली बेरोजगारांची फसवणूक

## आमदार संजय केळकर करणार कडक कायद्याची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. २६ :** नवीन गृह प्रकल्पाबरोबरच पुनर्विकास योजनेत नागरिकांची फसवणूक होण्याचे प्रमाण वाढले आहे. खासगी प्लेसमेंट सर्व्हिसच्या माध्यमातूनही बेरोजगार तरुणाची फसवणूक होत आहे. जनसेवकाचा जनसंवाद या कार्यक्रमातून आम्ही शेकडो कुटुंबांना न्याय देण्याचा प्रयत्न करत असून, मी येत्या पावसाळी अधिवेशनात फसवणूक करणाऱ्या विकसकांना आणि प्लेसमेंट केंद्रांना पायबंद घालण्यासाठी कठोर कायदा करण्याची मागणी करणार असल्याची माहिती आमदार संजय केळकर यांनी दिली. ठाणे शहराला घरांसाठी पहिली पसंती मिळत असल्याने ठाण्यात नवीन गृहप्रकल्प आणि पुनर्विकास योजना मोठ्या प्रमाणात सुरू आहेत, मात्र बऱ्याचदा या माध्यमातून सर्वसामान्यांची फसवणूक होते. पैसे भरूनही १० ते १५ वर्षे लोकांना घरे मिळत नाहीत, भाडे थकविले जाते, अशा तक्रारी वाढू लागल्या आहेत.

य श स्वी न ग र म ध्ये पुनर्विकासासाठी आवश्यक असलेली मालमत्ता पत्रके मिळवून दिल्याने येथील २८ इमारतींच्या पुनर्विकास योजनेचा मार्ग मोकळा झाल्याची माहिती केळकर यांनी दिली.



जनता दरबार हा उपक्रम भाजपसाठी नवीन नसून स्टेशनजवळील जुन्या कार्यालयात सुरू झालेला हा उपक्रम गेली ३५ वर्षे सुरूच आहे. सध्या खोपट येथे सुरू असलेल्या जनसेवकाचा जनसंवाद या उपक्रमातून दर सोमवारी आणि शुक्रवारी शेकडो लोकांशी संवाद साधला जात असून, त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे हा उपक्रम दिखाऊ नसून खऱ्या अर्थाने फलदायी असल्याचे मत आमदार संजय केळकर यांनी सांगितले.

# पावसामुळे रायगड जिल्ह्याचे जनजीवन विस्कळीत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अलिबाग, ता. २६ (वार्ताहर) :** संपूर्ण रायगड जिल्ह्यात शनिवारपासून (ता. २५) वादळी वाऱ्यासह मोसमी मुसळधार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे महाड, श्रीवर्धन, खालापूर, पेण तालुक्यातील जनजीवन विस्कळित झाले असून, सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी, बागायतदार, व्यावसायिकांना मोठा फटका बसला आहे. विजांचा कडकडाट, ढगांच्या गडगडाटासह दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे सखल भागांत पाणी साचले आहे. त्याचप्रमाणे रस्ते खचण्याचेही प्रकार घडले आहेत. काही मार्गावर झाडे पडल्याने वाहतूक बंद करण्यात आली आहे. २४ तासांत रायगड जिल्ह्यात सरासरी १४०.५६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. तर मे महिन्यात मॉन्सूनपूर्व पावसाची सरासरी ५७९ मिमी इतकी नोंद झाली आहे. मे महिन्यात पडलेल्या पावसाची आतापर्यंतची ही सर्वाधिक सरासरी आहे.

**24 तासांत रायगड जिल्ह्यात सरासरी 140.56 मिलिमीटर पावसाची नोंद**

**मे महिन्यात पडलेल्या पावसाची आतापर्यंतची ही सर्वाधिक सरासरी**

रायगड जिल्ह्यात रविवारी रात्री सुरू झालेल्या मुसळधार पावसाने हाहाकार माजला आहे. मुरूड तालुक्यात सर्वाधिक ३७१ मिमी पावसाची नोंद झाली असून, त्याखालोखाल श्रीवर्धन ३०७ मिमी, म्हसळा ३०० मिमी इतकी नोंद झाली आहे. तीन दिवसांपासून सातत्याने पाऊस पडत आहे. १ मेपासून रायगड जिल्ह्यात ढगाळ वातावरणास सुरुवात झाली होती. त्यानंतर १७ मेपासून अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्याने दक्षिण रायगडमध्ये पावसाच्या सरी कोसळू लागल्या. २१ मेपासून पावसाचा जोर वाढला आहे.

आतापर्यंत मॉन्सून सुरू होण्यापूर्वी मे महिन्यात इतक्या मोठ्या प्रमाणात केव्हाही पाऊस पडलेला नव्हता. पावसाच्या सरासरी तक्त्यातही मे महिन्याचा समावेश नव्हता. तो नव्याने करावा लागणार आहे. जिल्हा प्रशासनही अलर्ट मोडवर काम करीत असून, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची तात्काळ बैठक घेऊन सर्व विभागांना सज्ज राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

किल्ले रायगड मार्गावर कोंझर गावाच्या हद्दीत असलेल्या धबधब्याचा प्रवाह वाढल्याने रस्त्याला भगदाड पडले आहे. त्यामुळे रायगड मार्ग प्रवासासाठी बंद करण्यात आल्याची माहिती पोलिस उपअधीक्षक शंकर काळे यांनी दिली आहे. शहरातील एसटी थांबा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे.

# ठाण्यात गांज्याची तस्करी – दोन महिलांना अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** पुणे येथून ठाण्यात गांजा हा अमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या दोन महिलांना ठाणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेने खोपट एसटी थांबा येथून अटक केली. रेणुका शर्मा (३७) आणि संगीता राठोड (४२) अशी अटकेत असलेल्या महिलांची नावे आहेत. पोलिसांनी त्यांच्याकडून १० किलो वजनाचा गांजा जप्त केला आहे. महिलांनी सुटकेस आणि बॅगमध्ये छुप्या पद्धतीने हा गांजा आणला होता. बसगाडीने त्या ठाण्यात येत होत्या. पुणे येथून दोन महिला शनिवारी गांजा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या मालमत्ता शोध कक्षास मिळाली होती. या माहितीच्या आधारे, शनिवारी रात्री पथकांनी खोपट येथील एसटी थांब्याजवळ सापळा रचला होता. त्याचवेळी दोन महिला हातामध्ये बॅक आणि सुटकेस घेऊन बसगाडीमधून खाली उतरताना पथकाला दिसल्या. त्यांच्या हातातील बॅग आणि सूटकेसची तपासणी केली असता, त्यामध्ये १० किलो १३४ ग्रॅम गांजा आढळला.

# भरधाव कारची ट्रेलरला धडक

## महिलेचा मृत्यू; तीन जण जखमी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई, ता. २६ (वार्ताहर) :** भररस्त्यात थांबलेल्या ट्रेलरला मागून येणाऱ्या भरधाव कारने धडक दिली. या अपघातात कारमधील एका महिलेचा मृत्यू; तर कारचालकासह इतर तिघे जण गंभीर जखमी झाले. ही घटना शनिवारी पहाटे पनवेलजवळच्या पुष्पकनगर येथे घडली. पनवेल शहर पोलिसांनी या अपघाताला जबाबदार असलेल्या ट्रेलरचाकलाला ताब्यात घेतले आहे.

अपघातात मृत झालेल्या महिलेचे नाव रेश्मा रवींद्र तोरस्कर (४६) असे आहे; तर जखमीमध्ये त्यांचा मुलगा राकेश तोरस्कर (२५), गीतेश गोपाळ कुळये (३२) आणि स्नेहा राजेंद्र जाधव (२०) या तिघांचा समावेश आहे. तोरस्कर कुटुंबीय आणि त्यांचे नातेवाईक मुंबईत नेपेन सी रोड येथील जयप्रकाश नगरमध्ये राहण्यास आहेत. तोरस्कर कुटुंबीय रत्नागिरी संगमेश्वर येथील आपल्या मूळ गावी गेले होते. त्यानंतर ते सर्व जण कारने मुंबईत परतत होते. कार राकेश तोरस्कर चालवत होता. शनिवारी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास त्यांची कार पनवेल-जेएनपीए मार्गावर पुष्पकनगरजवळ आली होती. दरम्यान, जेएनपीएच्या दिशेने जाणाऱ्या ट्रेलरचालकाने अचानक भररस्त्यात ट्रेलर थांबवला. त्यामुळे पाठीमागून भरधाव येणारी तोरस्करची कार या ट्रेलरवर धडकली. त्यामुळे कार ट्रेलरच्या पाठीमागे अडकून पडली. या अपघातात कारमधील रेश्मा तोरस्कर यांचा मृत्यू झाला; तर कारचालक असलेला त्यांचा मुलगा राकेश व दोघे नातेवाईक असे तिघे जण गंभीर जखमी झाले. त्यामुळे पोलिसांनी या सर्वांना रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर पनवेल शहर पोलिसांनी या अपघाताला जबाबदार असलेला ट्रेलरचालक शंभू प्रेमचंद कुमार (५०) याच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याच्यावर पुढील कारवाई सुरू केली आहे.

# मान्सूनपूर्व पावसाने पालघरच्या शेतकऱ्यांची दैन्यावस्था

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वसई, ता. २६ (बातमीदार):

पालघर जिल्ह्यात अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणले आहे. हातातोंडाशी आलेले पीक वाहून गेले आहे. यात आंबा, चिकू, उन्हाळी भात तसेच भाजीपाला लागवडीचे नुकसान झाले. याचा पंचनामा हा जिल्हा कृषी विभागाकडून करण्यात आला आहे. यात एकूण २,७०० हेक्टरपेक्षा अधिक जमिनीचे क्षेत्र व नऊ कोटींहून जास्त नुकसान झाल्याचे म्हटले आहे. याबाबत शासनाकडे अहवाल सादर करण्यात आला आहे.

अवकाळी पावसाची अवकृपा पालघर जिल्ह्यावर झाली. या वेळी घरांसह बागायत क्षेत्र, मच्छीमारांच्या बोटी, वीज यंत्रणा कचाट्यात सापडली. जिल्हाधिकारी इंदुराणी जाखड यांनी त्वरित याकडे लक्ष देत तसे निर्देश संबंधित विभागांना देऊन पाहणीदेखील केली. पालघर जिल्हा हा आदिवासीबहुल क्षेत्र आहे. त्यामुळे शेती बागायतीवर जास्त शेतकरी अवलंबून आहेत. त्यांच्या उदरनिर्वाहाचे हे साधन आहे. नैसर्गिक आपत्ती पाठ सोडत नाही, अशीच परिस्थिती यंदादेखील निर्माण झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. पावसामुळे पालघर जिल्ह्यातील पीक वाया गेले. मजुरीपासून खत, ट्रॅक्टर, नांगर, भात, विविध भाजीपाला आणि बी-बियाण्यांसह अन्य खर्च तसेच मेहनत पाण्यात गेली. प्रचंड नुकसानीला सामोरे जावे लागले असून, शासनाने आता आर्थिक मदतीचा हात द्यावा, अशी मागणी शेतकरीवर्गातून करण्यात आली आहे. तसेच अवकाळी पावसाने वीटभट्टीत चिखल निर्माण झाल्यामुळे वीटभट्टीचालकदेखील आर्थिक कोंडीत सापडला आहे. आता प्रत्येक तालुक्यात पिकांचे पंचनामे केले असून, याचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला आहे, परंतु आता नुकसानभरपाई केव्हा मिळेल, याची प्रतीक्षा शेतकरी राजा करत आहे.

### पालकमंत्री गणेश नाईक यांचे कृषि विभागाला निर्देश

पावसाने जिल्ह्यात झालेले नुकसान पाहून त्यांना भरपाई मिळावी यासाठी तातडीने लक्ष देण्याचे निर्देश पालकमंत्री गणेश नाईक यांनी जिल्हा कृषी विभागाला केले होते. त्यानुसार प्रशासनाकडून त्वरित हालचाली सुरू झाल्या व प्रत्येक तालुक्यातील बागायत क्षेत्राचा पंचनामा करण्यास सुरुवात केली होती. मच्छीमार बांधवांचेदेखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. डहाणू येथील ६० बोटी अवकाळी पावसाच्या तडाख्यात सापडल्या, तर वादळामुळेदेखील मच्छीचे नुकसान झाले. घरांवरील पत्रे कोसळल्याने नुकसानभरपाई शासनाने द्यावी, अशी मागणी मच्छीमार बांधव करत आहेत.

# झाडे तोडण्यास महापालिकेची शुल्क सवलत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर, ता. २६ (बातमीदार) :** मिरा-भाईंदर मेट्रोसाठी डोंगरी गावात कारशेड उभारण्यात येणार आहे. त्यासाठी सुमारे दीड हजार वृक्ष तोडण्याची परवानगी महापालिकेने एमएमारडीएला दिली आहे. याबदल्यात सुरुवातीला तब्बल २० कोटी रुपये शुल्क भरण्यास एमएमआरडीएला भरण्यास महापालिकेकडून सांगण्यात आले होते; मात्र हे शुल्क जास्त असून, ते कमी करण्याची मागणी एमएमआरडीएने केल्यानंतर महापालिकेने हे शुल्क कमी करून आता केवळ साडेसात कोटी रुपयांवर आणले आहे.



कारशेडसाठी एमएमआरडीएने मिरा भाईंदर महापालिकेकडे दोन टप्प्यात वृक्षतोड करण्यासाठी परवानगी मागितली. पहिल्या टप्प्यातील १४०६ झाडे काढण्याची व पुनर्रोपण करण्याची परवानगी देताना महापालिकेने २० कोटी ७३ लाख रुपयांचे शुल्क भरण्यास एमएमारडीएला सांगितले. १४०६ वृक्षांपैकी ८३२ झाडे मुळासहित काढली जाणार आहेत, तर ५७४ झाडांचे पुनर्रोपण केले जाणार आहे. मुळासहित काढण्यात येणाऱ्या झाडांच्या बदल्यात ८२९२ झाडे लावण्यात येणार आहेत. त्यासाठी प्रतीझाड २५ हजार रुपये याप्रमाणे २० कोटी ७३ लाख रुपये महापालिकेकडून आकारण्यात आले, परंतु महापालिकेने आकारलेल्या शुल्कावर एमएमआरडीएकडून नाराजी व्यक्त करण्यात आली होती. २५ हजार प्रती झाड हे शुल्क खूपच जास्त आहे. एमएमआरडीए ठाणे व कल्याण डोंबिवली परिसरातही प्रकल्प राबवत असून, त्यांचे दर अत्यंत वाजवी व रास्त आहेत. त्यामुळे हे दर कमी करण्यात यावेत, असे पत्र एमएमआरडीएने मिरा-भाईंदर महापालिकेला देण्यात आले.

**आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी हे दर कमी करण्यास नुकतीच मान्यता दिली आहे. त्यानुसार ८,२९२ नवीन लागवड करण्यात येत असलेल्या झाडांच्या शुल्कात महापालिकेने मोठी कपात केली आहे. त्यामुळे या लागवडीसाठी आता एमएमआरडीएला सहा कोटी ७१ लाख रुपये तसेच वृक्षतोड व पूनर्रोपणासाठी चार लाख २१ हजार असे सात कोटी ४९ लाख रुपयांचे शुल्क आकारण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.**

**दुसऱ्या टप्प्यात ९९०० झाडांची तोड**

**दुसऱ्या टप्प्यात एमएमआरडीएकडून ९९०० झाडांची तोड तसेच पुनर्रोपण केले जाणार आहे, मात्र त्याला स्थानिक नागरिकांनी तीव्र विरोध केला असून, महापालिकेने त्यावर सुनावणी घेतली आहे. या सुनावणीनंतर एमएमआरडीएला वृक्षतोडीची परवानगी देण्याबाबत अद्याप कोणताही निर्णय महापालिकेने घेतलेला नाही.**

# रस्ता कि तलाव?

## पहिल्याच पावसात खोणी – तळोजा रस्त्याचा झाला तलाव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण जवळील मलंग गड डोंगर रांगांमध्ये रविवारी रात्री मुसळधार पाऊस कोसळला. पावसाचे हे पाणी मलंग गड परिसरातील नदी, नाले, ओहळांमधून पलावा, शिळफाटा, कल्याण बदलापूर रस्ता दिशेने वाहून आल्याने खोणी पलावा ते तळोजा रस्ता सोमवारी पाण्याखाली गेला. या रस्त्यावर काही ठिकाणी कामे सुरू आहेत. त्यामुळे वाहतुकीचा या रस्त्यावर खोळंबा झाला. पहिल्याच पावसाने खोणी पलावा ते तळोजा रस्ता, काटई बदलापूर रस्त्याचा काही भाग पाण्याखाली गेल्याने प्रवाशांनी आश्चर्य व्यक्त केले. कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर, भिवंडी परिसरातून दररोज खासगी वाहने, भाड्याच्या वाहनांनी पनवेल, तळोजा, पनवेल दिशेकडे अनेक प्रवासी प्रवास करतात. औद्योगिक क्षेत्रामुळे मालवाहू वाहनांची या भागातून वर्दळ असते. मुसळधार पाऊस पडत नसल्याने खोणी पलावा ते तळोजा रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत असेल असे वाटून नेहमीप्रमाणे प्रवासी या रस्त्याने सोमवारी गेले. पण या रस्त्यावर अनेक भागात पाणी साचल्याचे दिसले.

वाहन चालकांना अर्धा ते एक फुटाच्या पाण्यातून वाहने चालवावी लागली. वाहनाच्या इंजिनमध्ये पाणी घुसून वाहन बंद पडले तर पाण्यात अडकून पडायला नको म्हणून अनेक वाहन चालकांनी पाणी ओसरेपर्यंत वाहने रस्त्याच्या बाजुला उभी करून ठेवली. पाण्याचा प्रवाह अचानक वाढून वाहन वाहून गेले तर, अशीही भीती अनेक प्रवासी, वाहन चालकांमध्ये असल्याने त्यांनी झटपट या रस्त्यावरून माघार घेऊन पर्यायी रस्ते मार्गाने जाणे पसंत केले.




# क्रिकेट सट्टेबाजीच्या गैरप्रकारात वाढ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर, ता. २६ (वार्ताहर):

आयपीएलचा हंगाम रंगात असतानाच उल्हासनगरमध्ये सट्टेबाजीचा गोरखधंदाही जोमात सुरू आहे. ऑनलाइन आयडीच्या माध्यमातून युवकांना सट्ट्याच्या विळख्यात ओढण्याचे जाळे इतके मजबूत झाले की, स्थानिक पोलिसांच्या नजरेतून ते सुटत आहे. ठाणे खंडणीविरोधी पथकाच्या शाखेने नुकत्याच उघडकीस आणलेल्या कारवाईने या काळ्या धंद्याच्या खोल रचना उघड केल्या आहेत. जिथे पैसा, तंत्रज्ञान आणि युवकांचा भविष्य एकत्र जळत आहेत.

एकीकडे आयपीएल २०२५ अंतिम टप्प्यात पोहोचले असताना दुसरीकडे उल्हासनगरमध्ये क्रिकेट सट्टेबाजीचा गैरप्रकार वाढत असल्याचे दिसून येत आहे. शहरातील अनेक युवक या सट्टेबाजीच्या जाळ्यात अडकले आहेत. त्यातून त्यांची मानसिक, आर्थिक आणि सामाजिक वाताहत होत आहे. विशेष म्हणजे, स्थानिक पोलिसांनी यावर अद्याप ठोस पावले उचललेली नाहीत. परिणामी, ठाणे गुन्हे शाखेसारख्या बाह्य यंत्रणांना हस्तक्षेप करावा लागत आहे. ठाणे गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी पथकाने उल्हासनगर कॅम्प नंबर १ झुलेलाल मंदिर रोड परिसरात एक युवक यश संतवानी (वय २१) याला अटक केली. यश हा क्रिकेट सट्ट्यासाठी ऑनलाइन युजर आयडी देण्यासाठी एम. के. हार्डवेअर दुकानाजवळ आला असताना पोलिसांनी त्याला रंगेहाथ पकडले. याप्रकरणी महिला पोलिस अधिकारी मयूरी भोसले यांनी उल्हासनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक व्ही. एल. राठोड करत आहेत.

दरम्यान, उल्हासनगर परिमंडळ ४ चे पोलिस उपायुक्त सचिन गोरे यांच्याकडून ठोस कारवाईची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. स्थानिक पोलिस दलाने जर वेळेत आणि प्रभावी भूमिका बजावली असती, तर बाह्य यंत्रणांना हस्तक्षेप करण्याची वेळ आली नसती, असे जाणकारांचे मत आहे.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com





# फळेगावात वीज पडून चार वासरांचा मृत्यू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण तालुक्यातील मौजे फळेगाव येथे काल सायंकाळी सुमारे 4.30 च्या सुमारास आकाशात वादळ व विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस सुरू असताना गुरुनाथ बांगर यांच्या बेड्यावर वीज पडल्याची दुर्दैवी घटना घडली. या आघातात चार वासरे जागीच मृत्यूमुखी पडली आहेत. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही मानवी जीवितहानी झाली नाही, ही दिलासादायक बाब आहे.

विज पडल्यामुळे झालेल्या नुकसानीचा पंचनामा करण्यात आला असून, संबंधित अहवाल तयार करून तो पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्याची तजवीज करण्यात आली आहे. प्रशासनाकडून शासकीय मदतीसाठी आवश्यक ती प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. गुरुनाथ बांगर यांच्या कुटुंबाला या घटनेने आर्थिक आणि मानसिक धक्का बसला असून, शासनाने तत्काळ मदत जाहीर करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

ही घटना नैसर्गिक आपत्तीचा किती गंभीर परिणाम होऊ शकतो याची जाणीव करून देणारी आहे. वीज पडण्याच्या घटनांपासून जनतेने सतर्क राहावे, असे आवाहन हवामान खात्यानेही केले आहे.

# रायगड जिल्ह्यात ८ जूनपर्यंत जमावबंदी लागू – अपर जिल्हादंडाधिकारी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या शिफारशीनुसार आणि अपर जिल्हादंडाधिकारी यांच्या आदेशानुसार दि.25 मे 2025 रोजी 00:01 वाजल्यापासून ते 08 जून 2025 रोजी रात्री 24:00 वाजेपर्यंत जमावबंदी लागू करण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यातील खालापूर, खोपोली, रसायनी, रोहा, माणगाव, महाड, नागोठणे, अलिबाग या औद्योगिक भागांमध्ये कामगार संघटनांकडून आंदोलन व संप पुकारले जात असल्याने कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. याशिवाय धार्मिक व जातीय तणावाचे प्रसंग, तसेच आगामी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती (31 मे), रवी रावसाहेब देशमुख, उमापूर, ता.गेवराई, जि.बीड हे किल्ले रायगडावरील वाघ्या कुत्र्याच्या पुतळयाला झेड प्लस दर्जाची सुरक्षा महाराष्ट्र सरकारने द्यावी तसेच इतर विविध मागण्याकरिता किल्ले रायगडच्या पायथ्याशी बेमुदत धरणे आंदोलन (31 मे) आणि छत्रपती शिवाजी महाराज 352 वा राज्याभिषेक सोहळा कार्यक्रम (6 जून ) यामुळे देखील अस्थिरता उद्भवण्याची शक्यता लक्षात घेऊन ही अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

जमावबंदी दरम्यान खालील गोष्टींवर बंदी असेल :शस्त्र, लाठ्या, सुरे, तलवारी इ. वस्तू बाळगणे,स्फोटक किंवा ज्वलनशील पदार्थ घेऊन फिरणे,दगडफेक किंवा क्षेपणास्त्रे बाळगणे व तयार करणे,प्रतिमा किंवा आकृत्यांचे सार्वजनिक प्रदर्शन करणे,आक्षेपार्ह घोषणा, गाणी किंवा वाद्य वाजविणे,धोकादायक भाषण, हावभाव, चित्रप्रदर्शन पाच किंवा अधिक व्यक्तींचा जमाव परवानगीशिवाय जमविणे.

सूट कोणाला? या अधिसूचनेतून शासकीय अधिकारी, शासकीय कर्तव्यावरील कर्मचारी, तसेच शवयात्रा व अंत्यविधीसाठी जमणारा जमाव, आणि तहसीलदारांच्या परवानगीने आयोजित कार्यक्रम वगळण्यात आले आहेत.

तहसिलदार किंवा कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी परवानगी दिल्यासच कोणताही उत्सव, सभा, मिरवणूक आयोजित करता येणार असून त्याची जबाबदारी आयोजकांची असेल. पोलीस व जिल्हा प्रशासनाने नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन केले आहे.

# सर्प दंशाने महिलेचा मृत्यू



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील मौजे वेळुक येथील .यशोदा ( ताराबाई ) यशवंत वारघडे वय ६५ वर्ष यांचा उपचारा अभावी सर्प दंशाने रविवारी म्रुत्यु झाला आहे.

यशोदा (ताराबाई ) यशवंत वारघडे वय ६५ वर्ष,ह्या ग्रुहिणी, असुन २५ मे२०२५ रोजी त्या दिवसभरातील आपली कामे आटोपून रात्री झोपी गेल्या.मात्र मध्यरात्रीच्या सुमारास अंथरुणात असताना त्यांना आपल्या काहीतरी चावल्या सारखे वाटले.त्यानी आपले पती यशवंत वारघडे,यांस तसे सांगितले.तेव्हा त्यांच्या कुटुंबियांनी त्यांना प्राथमिक उपचारासाठी शिरोशी येथील शासकीय दवाखान्यात आणले, तेव्हा तेथील ड्युटीवर असलेल्या डॉक्टरांनी त्यांना टोकाकडे येथे हलविण्यास सांगितले.मात्र टोकावडे येथील डॉक्टरांनी पेशंटची स्थिती पाहून कुठलेही उपचार न करताच पेशंटला तात्काळ उपचार मिळावेत म्हणून उल्हासनगर येथील मध्यवर्ती रुग्णालयात नेण्यास सांगितले.तेव्हा टोकाकडे ग्रामीण रुग्णालयातुन पुढील उपचारासाठी घेऊन जात असतानाच रस्त्यात रायते गावाजवळच त्यांची प्राणज्योत मावळली.त्यांच्या पश्चात पती, दोन मुलगे, दोन सुना, नातवंडे,व असा मोठा परिवार आहे.मात्र त्यांच्या जाण्याने वेळुक गाव या पंचक्रोशीत शोककळा पसरली आहे.

# पुरात अडकलेल्या तिघांचा जीव वाचविण्या-या बाप लेकाचा कल्याण तहसीलदारांकडून सत्कार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : उल्हास नदीस अचानक आलेल्या पुरामध्ये गुरे चारण्यासाठी गेलेले तिघे जण अडकले,परंतु स्वतः चा जीव धोक्यात घालून गाळेगावच्या बापलेकांनी होडितून जाऊन, त्यांचा जीव वाचवला ,या धाडसा बद्दल कल्याण तहसीलदार सचिन शेजाळ यांनी दोघांचा सत्कार ही केला. परंतु या निमित्तानं, आपत्ती व्यवस्थापन चे धिंडवडे निघाले त्याचे काय?

गाळेगाव मोहिली परिसरातील दत्तू मंगल्या गायकर, वय५५,शंकर गडल्या पाटील५५आणि सावळाराम गोप्या वाघे, वय६०वर्षे हे गुरे चारण्यासाठी नदीच्या परिसरात गेले होते, परंतु उल्हास नदीस अचानक आलेल्या पुरामुळे ते बेटावर च अडकले, त्यांनी आपली जनावरे कशीबशी तीरावर सुखरूपपणे पोहचवली. परंतु ते तेथेच अडकले, नदीच्या पुराच्या पाण्याने त्यांना चारही बाजूंनी घेरल्याने परिस्थिती गंभीर बनली,यांना वाचवण्यासाठी येथील सामाजिक कार्यकर्ते संतोष शिंगोळे यांनी ही वार्ता कल्याण तहसील कार्यालयाला कळवली,कल्याण तहसील कार्यालयाला याबाबत माहिती मिळताच मंडळ अधिकारी,चेतन पष्टे, अग्निशामक अधिकारी श्री तडवी हे महाशय घटनास्थळी पोहोचले खरे!पण पुराचा वेग इतका की कोणाचेही पाण्यात जाण्याचे धाडस होईना,अखेरीस गाळेगाव येथील गुरुनाथ हनुमंत पवार, आणि त्यांचा मुलगा कु रोहन गुरुनाथ पवार यांनी स्वतः चा जीव धोक्यात घालून स्वतःच्या होडीतून प्रंचड वेगानं वाहणाऱ्या पुराच्या पाण्यात जाऊन गुरें चारण्यासाठी गेलेल्या तिघांचा जीव वाचवला,त्यांचे हे काम नक्कीच कौतुकास्पद व प्रेरणादायी आहे, परंतु या निमित्तानं आपत्ती व्यवस्थापन बाबतीत काही प्रश्न उपस्थित होतात, आपले अधिकारी, कर्मचारी घटनास्थळी पुर्ण तयारी निशी गेले नव्हते का? आपल्या बोटी, रिस्क्यू टिम कुठे होती, जीव धोक्यात घालून पुरात उतरलेल्या दोघांना'लाईफजॉकेट, का दिली नाही? त्यांच्या जिवाचे बरेवाईट झाले असते तर त्याला कोण जबाबदार? आपती व्यवस्थापन समितीच्या वेळोवेळी घेतलेल्या बैठका कशासाठी? त्याचा काय उपयोग? या सर्व प्रश्नाचे प्रशासनाकडे काय उत्तर आहे? निदान भविष्यात तरी अशा गंभीर चुका व्हायला नको याचा लोकप्रतिनिधी व शासनाने विचार करायला हवा.

**आपती व्यवस्थापनाचे काय?**






# केडीएमसी हद्दीत कोरोनाचा शिरकाव : एकाचा मृत्यू

## नागरीकांनी सतर्क राहण्याचे केडीएमसीचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिका हद्दीत कोरोनाचा शिरकाव झाला असून करोनामुळे एकाचा मृत्यू झाला आहे. चार कोरोना रुग्णावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत, अशी माहिती आरोग्य खात्याचे उपायुक्त प्रसाद बोरकर यांनी दिली आहे.

सुत्रांकडून मिळालेल्या महितीनुसार गुरुवारी एका 47वर्षीय महिलेला ताप ,येत असल्याने टाईफायड झाल्याने खाजगी रूग्णालयात उपाचार्थ दाखल केले असता शुक्रवारी तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. शनिवारी कोरोना टेस्ट अवहाल प्राप्त झाल्यावर कोरोना झाला असल्याची महिती समोर आली. सद्यस्थितीत कोरोना बाधित चार रूग्णांना पैकी, 1रूग्ण घरी उपचार घेत असून, दोन कोरोना बाधित रूग्णावर रूग्णालयात उपचार सुरू असून एका कोरोना बाधित रूग्णाला उपाचार्थ कळवा शासकीय रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

या पार्श्वभूमीवर नारीकांनी आरोग्य विषयी सर्तकता बाळगावी असे आवाहन आरोग्य खात्याकडून करण्यात आले आहे. महापालिका हद्दीत कोरोनाचे चार रुग्ण आढळून आले.त्यापैकी एकाचा मृत्यू झाल्याने कोरोनाने पुन्हा कल्याण डोंबिवली शहरात शिरकाव केला आहे. या पूर्वी मार्च २०२० मध्ये आलेल्या कोरोना मुळे कल्याण डोंबिवली ही दोन्ही शहरे कोरोनाचा हॉटस्पॉट ठरली होती. पहिली, दुसरी आणि तिसरी लाट कोरोनाची आली होती. तिसऱ्या लाटेनंतर कोरोनाचा प्रादूर्भाव कमी झाला. त्यानंतर कोरोना दूर पळला होता. आत्ता पुन्हा कोरोनाचा शिरकाव झाल्याने नागरीकांमध्ये भितीचे वातावरण पसरू शकते. मात्र नागरीकांनी घाबरुन न जाता आरोग्य विषय काळजी घ्यावी. कोरोनामुळे एकाचा मृत्यू झाल्याने महापालिकेने कल्याणच्या रुक्मीणीबाई आणि डोंबिवलीच्या शास्त्रीनगर रुग्णालयात आयसोलेशन वार्ड सुरु केले आहे. तसेच उद्यापासून कोरोना टेस्टकरीता आरटीपीसी टेस्ट ल'बही सुरु केली जाणार असल्याची माहिती उपायुक्त बोरकर यांनी दिली आहे.उपायुक्त बोरकर यांनी आवाहन केले आहे की, श्वास घेण्यास त्रास झाल्यास, सर्दी, खोकला, अंगदुखी, घसा धरणे आदी लक्षणे जाणवल्यास तातडीने संबंधित रुग्णाने नजीकच्या आरोग्य केंद्रात जावे. लक्षणे सौम्य स्वरुपात असली तरी कोरोना टेस्ट करुन घ्यावी. त्याचबरोबर नागरीकांनी गर्दीच्या ठिकाणी जाणे, टाळावे, मास्कचा वापर करावा, सोशल डिस्टन्स पाळावे, शिंकताना तोंडावर रुमाल धरावा. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे टाळावे. वेळीच उपचार घेतला तर रुग्ण कोरोनामुक्त होऊ शकतो.

# पावसात वीज यंत्रणेपासून सतर्क राहण्याचे महावितरणचे आवाहन

## कल्याण परिमंडलात चोवीस तास नियंत्रण कक्ष कार्यान्वित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : वादळी व संततधार पाऊस किंवा अतिवृष्टी, पूर परिस्थिती, झाडे व फांद्या कोसळल्याने तुटलेल्या वीजतारा, विजेची उपकरणे किंवा यंत्रणेमधील शॉर्टसर्कीट आदींमुळे वीज अपघाताची शक्यता असते. या पार्श्वभूमिवर नागरिकांनी सार्वजनिक व घरगुती वीजयंत्रणा, उपकरणांपासून सतर्क राहावे. तसेच पूर किंवा अतिवृष्टीमुळे कोणत्याही क्षणी प्रतिकूल स्थिती, धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन खबरदारीचा उपाय म्हणून रोहित्रांचा वीजपुरवठा बंद ठेवण्यात येतो. अशा स्थितीत वीज ग्राहकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे. कल्याण परिमंडलांतर्गत सर्वच मंडल कार्यालयांमध्ये चोवीस तास नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आले आहेत. तर आपत्कालीन परिस्थितीत साधनसामग्री व मनुष्यबळासह सज्ज राहण्याचे निर्देश मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी दिले आहेत.

अतिवृष्टी, वादळी पाऊस आदींमुळे तुटलेल्या वीजतारा, वीजखांब, रस्त्याच्या बाजूचे फिडर पिलर, रोहित्रांचे लोखंडी कुंपण, फ्यूज बॉक्स तसेच घरातील ओलसर विद्युत उपकरणे, शेतीपंपाचा स्वीचबोर्ड, विद्युत यंत्रणेजवळील इतर ओलसर वस्तु, साहित्य आदींमुळे विद्युत अपघात होण्याची शक्यता असते. पाणी हे विजेचे वाहक असल्याने पावसाळयात विद्युत उपकरणांचा पाण्यापासून बचाव करणे आवश्यक असते. मुसळधार पाऊस व जोराचा वारा यामुळे झाडे व फांद्या वीजतारांवर पडतात. यामध्ये वीजखांब वाकतात, वीजतारा तुटतात किंवा लोंबकळत राहतात. अशा वीजतारांमध्ये वीजप्रवाह असण्याची शक्यता असल्याने, त्यापासून सावध राहावे. या वीजतारांना हात लावण्याचा किंवा हटविण्याचा प्रयत्न करू नये. असे प्रकार आढळल्यास तातडीने महावितरणशी संपर्क साधावा.

पावसाळयात घरातील स्वीचबोर्ड किंवा विजेच्या विविध उपकरणांचा ओलाव्याशी संपर्क येणार नाही, याची खबरदारी घ्यावी. घरातील वीजपुरवठ्याला आवश्यक अर्थींग केल्याची खात्री करून घ्यावी. फ्यूज तार म्हणून तांब्याऐवजी ॲल्युमिनियम अलॉय ही विशिष्ट धातुची तार वापरावी. विजेवर चालणारे सर्व उपकरणे नेहमी स्वीचबोर्डपासून बंद करावित. विशेषतः ग्रामीण भागात विजेच्या खांबांना जनावरे बांधू नयेत. विजेचे खांब किंवा तारांजवळ कपडे वाळत घालू नयेत.

वीज ग्राहकांसाठी महावितरणचे मध्यवर्ती ग्राहक सेवा केंद्राचे १८००-२१२-३४३५ किंवा १८००-२३३-३४३५ हे टोल फ्री क्रमांक २४ तास उपलब्ध आहेत. यासह मोबाईल ॲप, www.mahadiscom.in या वेबसाईटद्वारेही तक्रारी स्विकारल्या जातात. वीजपुरवठा खंडित झाल्याची तक्रार करण्यासाठी महावितरणकडे नोंदणी केलेल्या मोबाईल क्रमांकावरून ०२२-५०८९७१०० या क्रमांकावर मिस् कॉल दिल्यास किंवा मोबाईल क्रमांकावरून NOPOWER<space><Consumer Number> हा संदेश ९९३०३९९३०३ या महावितरणच्या मोबाईल क्रमांकावर पाठविल्यास तक्रार नोंदविली जाईल.

याशिवाय कल्याण परिमंडलातील कल्याण मंडल एक आणि दोनसाठी (कल्याण पूर्व व पश्चिम, डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर, शहापूर, टिटवाळा) ८८७९६२६१५१, वसई मंडलासाठी (वसई, विरार, नालासोपारा, आचोळे, वाडा) ७८७५७६०६०२, पालघर मंडलासाठी (बोईसर, डहाणू, जव्हार, पालघर, मोखाडा, सफाळा, तलासरी, विक्रमगड) ९०२८१५४२७८ हे नियंत्रण कक्षाचे क्रमांक ग्राहकांच्या तक्रारी व धोक्यांची सूचना देण्यासाठी उपलब्ध आहेत.

# आयपीएल क्रिकेटचा फिवर अंबरनाथच्या 3 पोलिसांना भोवणार !

## कर्तव्यचुकार पोलिसांवर कारवाईची संभाजी ब्रिगेडची मागणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : आयपीएल क्रिकेट च्या नादाने संपूर्ण देश वेडावलाय. देशातील मोठा सट्टा याच खेळावर चालतो. त्या मोहापासून अंबरनाथचे ऑन ड्युटी असणारे तीन पोलीस कर्मचारी देखील वाचू शकले नाहीत. इकडे अंबरनाथच्या कर्तव्यावर हजर असतांना ड्युटीशी बेइमानी करून हे तीन पोलीस कर्मचारी थेट मुंबईच्या वानखेडे स्टेडियम मध्ये क्रिकेटचा सामना बघायला निघून गेले. त्यामुळे अशा कर्तव्य चुकार पोलिसांवर पोलीस विभागाने कठोर कारवाई करण्याची मागणी संभाजी ब्रिगेडचे सचिव व पत्रकार प्रफुल थोरात यांनी केली आहे.

थोरात यांनी पोलीस आयुक्त तसेच गृहमंत्र्यांना केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, २१ मे रोजी, अंबरनाथ पोलिस स्टेशन (पश्चिम) मधील तीन पोलिस कर्मचारी हे ऑन ड्युटी असतांना आपल्या कर्तव्यास बगल देऊन मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर आयपीएल क्रिकेट सामन्याचा आनंद घेत असतांना पकडले गेले. यामध्ये कॉन्स्टेबल सागर मुंडे, कॉन्स्टेबल अनिल ठोंबरे आणि हेड कॉन्स्टेबल दत्तात्रेय विशे यांचा समावेश आहे. हे पोलीस कर्मचारी रात्री ११ वाजेपर्यंत मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील सामना पाहण्यासाठी वानखेडे स्टेडियमच्या व्हीआयपी स्टँडवर दिसले.

हे कर्मचारी त्यांच्या कर्तव्य काळात परिमंडळ ४ चे स्थानिक पोलिस उपायुक्त, अंबरनाथ विभागाचे सहाय्यक पोलिस आयुक्त किंवा अंबरनाथ पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांची संमती न घेता क्रिकेटचा सामना पाहण्यासाठी निघून गेले . विशेष म्हणजे हा सामना पाहण्यासाठी या पोलिसांना तिकीट खरेदी करून देणारा हा अंबरनाथ मधील एक मटका किंग असल्यामुळे शहरात अधिक खळबळ उडालीच . त्यामुळे जुगारी आणि पोलिसांचे संबंध चव्हाट्यावर आले असल्याचा आरोप थोरात यांनी केला आहे.

या पोलीस कर्मचारींनी त्यांच्या ज्ञात उत्पन्नापेक्षा जास्त मालमत्ता जमवल्याबद्दलचा गंभीर आरोप करत त्यांच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी मागणीही थोरातांनी केलीय. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किशोर शिंदे यांनी, हा क्रिकेट सामना पाहण्यासाठी या कर्मचाऱ्यांना मी स्वतः परवानगी दिल्याचे सांगितले असले तरी, पी सी आर वॅन सारख्या महत्वाच्या ठिकाणी ड्युटीवर असतांना त्या 3 पोलीस कर्मचारी यांना जाण्याची अनुमती कशी मिळतेच कशी ? हा प्रश्न थोरात यांनी उपस्थित केलाय. शिंदे हे त्या पोलिसांना वाचवण्याचा प्रयत्न करत होते परंतु, दाव्याच्या समर्थनार्थ कागदपत्रे मागितली असता, शिंदे टाळाटाळ करत असल्याचेही थोरात यांनी सांगितले आहे. या संदर्भात परिमंडळ ४ चे पोलीस सहाय्यक आयुक्त शैलेश काळे यांना पत्रकारांनी विचारले असता त्यांनी सदर प्रकरणाची चौकशी सुरू असल्याचे सांगितले.






# आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत पेणच्या दोन बहिणींनी मिळवले सुवर्ण पदक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



पेण : रायगड जिल्ह्यातील पेण येथील युनायटेड शोतोकान कराटे असोशिएशन मध्ये रविंद्र म्हात्रे ह्यांच्या कडे प्रशिक्षण घेत असलेया ,रितुल रविंद्र म्हात्रे, रविना रविंद्र म्हात्रे या दोघींनी आपला खेळ दाखवत सुवर्ण पदक जिंकून आल्याने पेणसह रायगडच्या नावलौकिकात भर पडली असून दोघींचे सर्वत्र अभिनंदन होत आहे

नुकतेच पेण येथे आगमन होताच श्री ज्ञानेश्वर मित्र मंडळाचे सदस्य व कराटे कोच रविद्र रमेश म्हात्रे व सौ. श्रुती रवींद्र म्हात्रे यांच्या दोन्ही मुलींनी भुतान येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय मर्दानी स्पोर्ट आणि इंन्डो भूतान कराटे स्पर्धेत सुवर्ण पदक संपादित करून भारताचे नाव उंचावले तसेच रायगड पेण व श्री संत आळीचे पण नाव उंचावले या बद्दल मंडळाच्या वतीने व पेणकरांच्या वतीने सत्कार करण्यात आला.तसेच मर्दानी स्पोर्ट एशियनचे अध्यक्ष मंदार पनवेलकर सचिव संतोष खंदारे तसेच युनायटेड शोतोकान कराटे असोशिएशन तर्फे व मर्दानी स्पोर्ट तर्फे अभिनंदन केले.




जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558


'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024